| जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट - www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@ gmil.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा - महसूल १ |
| क्र.२०२०/आरबी-१/डेस्क-२/टे-४/सिआर- | दिनांक १८.०३.२०२० |

प्रति,

सह-जिल्हा निबंधक वर्ग-१,

व मुद्रांक जिल्हाधिकारी, नांदेड

**विषयः-** राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याबाबत.

(कार्यालयात येणारे खरेदी/विक्रीदार यांची गर्दी नियंत्रीत करणे बाबत)

**संदर्भः-**१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना / २०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे खंड २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२० .

४) शासन परिपत्रक क्र.समय-२०२०/प्रक्र.३१/१८ (र.व का.) दि.१६.०३.२०२०.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

संदर्भ क्र.४ वरील शासन परिपत्रकाव्दारे कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बायोमेट्रीक उपस्थित प्रणालीचा वापर मर्यादित कालावधीसाठी स्थगित करण्यात आला आहे.

आपल्या कार्यालयात दस्त नोंदणीचे वेळी खरेदी/विक्रीदार यांची बायोमेट्रीक पध्दतीने नोंद घेतली जाते. त्यामुळे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे, त्या आधारे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून खालील प्रमाणे उपायोजना करावेत.

१) कार्यालयाचे मुख्य प्रवेशव्दाराचे ठिकाणी गार्डची नेमणूक करावी.

२) कार्यालयात दस्त नोंदणीसाठी येणा-या व्यक्तींची कार्यालयात गर्दी होणार नाही या दृष्टीने प्रत्येक खरेदी/विक्रीदारास टोकन देण्यात यावा व त्यावर क्रमांक व वेळ नमुद करावा आणि त्या क्रमांक व वेळेनुसारच सदर व्यक्तीस कार्यालयात प्रवेश द्यावा. तसेच, एका वेळी पाच पेक्षा जास्त नागरीकांची गर्दी कार्यालयात होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३) दस्त नोंदणीसाठी दिलेल्या वेळेवरच कार्यालयात प्रवेश दिला जाईल त्यामुळे कार्यालयाबाहेर नागरीकांनी गर्दी करुनये/ थांबु नये याबाबत सुध्दा सुचना फलक व टोकन क्रमांक देत असतांना संबधितास अवगत करावे.

४) बायोमेट्रीकचा वापर करण्यापूर्वी व वापर केल्यानंतर प्रत्येक नागरीकास तसेच, बायोमेट्रीक मशीन हाताळणारे कर्मचारी यांना सॅनिटायजर उपलब्ध करुन द्यावे व त्याचा वापर करणे बंधनकारक करावे.

५) कार्यालयाच्या बाहेर देखील गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. एका ठिकाणी पाच पेक्षा जास्त व्यक्ती थांबणार नाहीत ते सुध्दा दोन ते तीन फुटाचे अंतरावर थांबतील याची दक्षता घ्यावी.

वरील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी आपली राहील त्याबाबत वेळोवेळी पहाणी करुन अहवाल सादर करावा.

सही/-
(डॉ. विपीन इटनकर) भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) पोलीस अधीक्षक, नांदेड
२) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
३) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**